# शुभो दृष्टी

-सौ. रश्मी वाघमारे

अगदी भल्या पहाटे पिशी मांचा दणदणीत आवाज कानावर आदळला- "शोनाली ऊठ! ऊठ बेटा. सूर्य उगवायच्या आधी हे खायला हवंय!"

"ओ मां! कुणी हे नियम केलेत कुणास ठाऊक? तरी बरं, पूर्वी म्हणे ब्राह्ममुहूर्तावर आठ-दहा सुवासिनींबरोबर नवऱ्या मुलीला गंगातीरी नेण्यात येत असे नंतर गंगामाईला लग्नाचे निमंत्रण देऊन गंगेच्या पाण्याने नवरी मुलगी आंघोळ करीत असे."

शोनाली धडपडत उठली: "हो हो पिशी मां! आलेच हं दोन मिनिटात."
त्यानंतर तोंड धुवून तिनं मोठ्या प्रेमानं तिच्या आत्याने दिलेले खाऊन घेतलं. आता लग्न लागेस्तोवर तिला काहीही खायचं नव्हतं. घरातील पाहुणे मंडळी, मुलांचा गोंगाट- नंतर काही डोळा लागला नाही. मध्येच मां येऊन खांद्यावर थोपटून गेली. "शोना. थोडी झोपतेस का ग? डोळे बघ कसे लाल झाले आहेत. दार बंद करून घे आणि तासभर चांगली झोप घे, आराम कर. मग तुला अजीबात वेळ मिळणार नाही. लग्नाच्या वेळी चेहरा उतरलेला दिसायला नंको, नाहीतर काय म्हणतील सगळी मंडळी?" माँ प्रेमानं बोलली.”

शोनाली, सुजय मुखर्जीची एकुलती एक सुकन्या. उच्चशिक्षित, स्मार्ट, हुशार आणि स्वतंत्र विचारांची! मुखर्जीबाबूंनी तिला मुलासारखीच वाढवली."छे, छे! मी माझ्या मुलीवर कधीही कोणतेही दडपण आणणार नाही." ते म्हणायचे. यावर तिच्या आईचा- मृण्मयीचा विरोधही असे. अहो, मुलीला हे एवढं लाडावून ठेऊ नये. तिची एवढी स्वतंत्र मते बनू देऊ नका. पुढे जड जाईल. कितीही झालं तरी ती उद्या दसऱ्या घरी नांदायला जायची आहे.

पण बाबा मुळी मांच्या धमकावणीकडे कधीही लक्ष देत नसत. शोनाली उपवर झाली. मुखर्जीबाबूंनी अतिशय मेहनतीने तिच्या योग्य असा वरं शोधून काढला. सुसंस्कृत परिवार, उच्चशिक्षित, चांगला दिसणारा, वागणारा, मोठा पगार असलेला (थोडक्यात म्हणजे वेल्-सेटल्ड)-अभिजित शेवटी त्यांनी निश्चित केला. शोनालीचा आणि अभिजितचा रीतसर परिचय करून देण्यात आला. त्यानंतर सगळंच कसं रीतसर ठरविल्यासारखे पार पडले. सहा महिने तिची आणि अभिजितची कोर्टशिप सुरू होती. दोघेही एकमेकांबरोबर फिरणे, वेळ घालविणे, जे काही या कोर्टशिपच्या व्याख्येत बसत होते ते सर्व काही करीत होते. कुठेही काहीही खटकण्यासारखे नव्हते.

मग आजच मला ही अस्वस्थता एवढी प्रकर्षाने का बरे जाणवते आहे? मला माझा मनमीत सापडला आहे आणि - संध्याकाळी, मी पूर्णपणे त्याची होणार, हा समर्पणांचा भाव मनात का बरे येत नाहीय?' शोनाली मनातल्या'मनात विचार करू लागली.

अगदी साधे प्रसंग, आवडीचा रंग किंवा वस्तू तिला जे आवडायचं ते डावलून अत्यंत खुबीने, तिला न दुखवता तो स्वत:च्या आवडी-निवडीवर शिक्कामोर्तब करी. पण हे काही कारण नव्हते लग्नाच्या दिवशी सकाळी अस्वस्थ व्हायला! शोना स्वत:शीच पुटपुटली.

तिलां आठवलं, एकदा सकाळी ११ वाजताच त्याला फोन केला. 'ए काय करतोस? तुझ्याकडे पाच मिनिटे आहेत का? मी एक छान पेटिंग पूर्ण केले आहे. येशील लंचमध्ये घरी बघायला? अगदी आताच पूर्ण केले आणि तुलाच सगळ्यात आधी फोन केलाय्."

तो जवळजवळ चिडलाच. "ए शोना, काय ग हे मूर्खासारखं? मला आता खूप महत्त्वाच्या मीट्स आहेत. असा सकाळी फोन करीत जाऊ नकोस. तुझे पेंटिंग ना? घरीच राहणार आहे. वेळ मिळाला की लगेच येतो." तो दुसऱ्याच दिवशी आला, तिच्या-पेंटिंगचे भरपूर कौतुक करून गेला. एक छानसं गिफ्ट ही आणलं, मात्र त्यातील गंमत केव्हाच निघून गेली होती, उरला होता फक्त व्यवहार!

असांच एक छोटा प्रसंग. एका मॉलमध्ये फिरेताना तिचा बालमित्र मिहिर अचानक दिसला. दोघेही अत्यानंदाने ओरडले- "अरे वा! कसं? काय? कुठे?कधी?केव्हा...?" अशी प्रश्नांची सरबत्ती करीत असतानाच दोघांचेही चेहरे आनंदाने जणू उजळून निघाले.. क्षणभर दोघांनाही अभिजितचा विसर पडला. लगेच भानावर येत शोनाने अभिजितशी ओळख करून दिली. "हा मिहिर. माझा खास दोस्त आणि मिहिर, हा अभिजित माझा वुड बी!" दोघांनी हस्तांदोलन केले.

"शोनाली निघू या." अभिजितने हळूच पण जरबेने जणू आज्ञाच केली.

असे छोटे-मोठे प्रसंग, तिने उत्तर म्हणावे की त्याचे दक्षिण ठरलेले! हो, पण म्हणून काय झाले? मां-बाबांनी तर लग्नाच्या दिवशीच एकमेकांना पाहिले होते. वादविवाद, भांडणे, रुसवे-फुगवे असूनही अनेक सुखी जोड्या तिने पाहिलेल्या होत्या.

"हे काही मनातील अशांततेचं कारण असू शकत नाही. नाही का?"शोना स्वगत बोलली.

"शोना काय झालं बेटा? तुला काय होतंय? घाबरू नकोस. आम्ही साऱ्या जणी यातूच गेलोय्."पिशी मां प्रेमानं समजावीत म्हणाली.

"चल बेटा, वराकडील मंडळी हळद लावायला आली आहे." तेवढ्यात मंगल शंखध्वनी ऐकू आला आणि मी उठले. त्यानंतर हळद लावून, स्नान करून भटजींच्या मंत्रोच्चारात शंखाचा चुडा भरण्याचा कार्यक्रम झाला. नवरा-नवरीसाठी सजविलेले दोन सुंदर पाट पाहन तर वऱ्हाडी मंडळींनी तोंडात बोटे घातली, "अरे वा, किती सुंदर!"

वराकडील मंडळींनी तिच्यासाठी आणलेले कपडे, दागिने तिला देण्यात आले. एकाहून एक सरस वस्तू! "अरे हे काय, हा जर्द निळा रंग मंला मुळीच न आवडणारा!" तिला अभिजितची एक विशिष्ट नजर आठवली. तेवढ्यात अभिजितची बहीण जवळ येऊन म्हणाली,"आवडला ना बनारसी साडीचा रंग!
माझ्या भावाला निळा रंग खूप आवडतो." लग्नाचे छोटे विधी पार पडू लागले. संध्याकाळ झाली. शोनाली तयार व्हायला लागली. 'अरे, अजूनही माझ्या मनात शांतता का नाही? माझ्या मनात हे काय चाललेय? याचे. उत्तर काय...?

"तिला तयार करण्यांत आले. निळ्या रंगाचे (त्याच्या आवडीचे) महावस्त्र नेसून, दागिने लेवून नवरी दृष्ट लागण्पासारखी सुंदर दिसू लागली.

आता शुभो दृष्टी! सगळ्यात महत्त्वाचा विधी. नवऱ्या मुलीचा मामा तिला पाटावर बसवून उचलून वराभोवती सात फेरे घेतो. सातव्या फेरीच्या वेळी नवरीच्या डोळ्यापुढे

तिने धरलेले विड्याचे पान नवरा मुलगा दूर करतो आणि वधू-वर एकमेकांना प्रथम पाहतात ती शुभो दृष्टी!

शोनालीने मनाशीच ठरविले होते की, पाटावर बसून कुणीतरी उचलून ते सात फेरे मारण्याऐवजी आपण स्वत:च चालत फेरे पूर्ण करायचे.. कारण आता बऱ्याच ठिकाणी ही सुधारणा करण्यात आली आहे. तशात ऋषिमामांचीं प्रकृती काही एवढी मजबूत नव्हती.

पाहुण्या-रावळ्यांनी मंडप गजबजला. अभिजित, फुलांनी सजविलेल्या मंडपीत उभा होता. उत्सुक, खुशीत. शोनालीला मंडपीत आणले गेले. तिचे मामा सुंदर सजविलेला पाट घेऊन आले. "ये बेटा, बैस." मामा म्हणाले.

"मामा, मी चालतच हे सात फेरे पूर्ण करते. तुम्हाला एवढे श्रम झेपणार नाहीत." असे म्हणून डोळ्यासमोर विड्याचे पान घेऊन शोनालीने अभिजित भोवती प्रदक्षिणेचे पहिले पाऊल उचलले आणि अभिजित म्हणाला, "शुभो दृष्टी जुन्या परंपरेनुसारच व्हायला पाहिजे. मला हे असले थेर चालणार नाहीत!.

"मामाजी, तिला उचला." आणि त्याच्या डोळ्यात तीच विशिष्ट जरब तिला प्रकर्षाने जाणवली आणि... आणि शोना कोसळली. दोन रात्रींची-अस्वस्थता, अशांतता, तिला उत्तर सापडले होते. "नाही... नाही... कुणीतरी बाबांना बोलवा." ती क्षीण आवाजात बोलली. कुणीतरी तिला पाणी पाजले. ती भानावर आली. बाबा तिला आधार देऊन उठवीत होते. "बाबा, मला तुम्ही घरी घेऊन चला. आताच्या आता. मी घरी जाणार. मला काहीही विचारू नका."

बाबांनी कुणाला तरी आवाज दिला. तिला घरी घेऊन जायला सांगितलं आणि काहीही न बोलण्याविषयीही बजावलं. बाबा! आठवतंय ना, तुम्ही मला म्हंटले होते- पोरी, तुला पटलं नाही, तर हा बाप तुला बोहल्यावरूनही परत घेऊन जाईल! विश्वास ठेव माझ्यावर. मी तुला काहीही विचारणार नाही! बाबा, खरंच असे वडील सर्व मुलींना का नसतात हो?"

सारा लग्नमंडप स्तब्ध झांला होता. मुखर्जीबाबूंनी जमलेल्या समुदायाची हात जोडून माफी मागितली आणि शांतपणे ते घराकडे चालू लागले...!

****